N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - 1)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** अकोला  **P.S.(ठाणे):** तेल्हारा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0322  **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 25/09/2023 19:47

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 25/09/2023

**Date To ( दिनांक पर्यंत):** 25/09/2023

**Time From (वेळेपासून):** 12:10 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 25/09/2023  **Time (वेळ):** 19:47 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 024

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 25/09/2023 19:47 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 0.5 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** कषी उत्पन्न बाजार समीती ,तेल्हारा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** गौरव गजानन धुळे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1994

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | जय बजरंग चौक तेल्हारा,तेल्हारा,तेल्हारा,अकोला,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | जय बजरंग चौक तेल्हारा,तेल्हारा,तेल्हारा,अकोला,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रदिप मधुकरराव ढोले | | | 1. घोडेगांव ,तेल्हारा,तेल्हारा, अकोला,महाराष्ट्र,भारत |
| 2 | सुनिल मोतीराम इंगळे | | | 1. हिवरखेड,तेल्हारा,तेल्हारा, अकोला,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

पोस्टेला आल्यावर त्वरीत दाखल केला

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | एक लाख रु | 100,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

100,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

नक्वल फिर्याद पोलीस स्टेशन तेल्हारा जि. अकोला दिनांक- 25/09/2023.माझे नाव श्री. गौरव गजानन धुळे, वय-29 वर्ष, शिक्षण-12वी, व्यवसाय-हमाली ठेकेदार, रा.जयबजरंग चैक, तेल्हारा, ता. तेल्हारा अकोला मी आज दिनांक 25/09/2023 रोजी पोलीस स्टेशन तेल्हारा, जि. अकोला येथे समक्ष हजर येवुन फिर्याद देतो की, मी वर नमुद ठिकाणी राहतो व हमाली ठेकेदारीचा व्यवसाय करतो. मी दिनांक 20/09/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंध विभाग अकोला येथे तक्रार दिली की, कृषी उत्पन्न बाजार समिती, तेल्हारा जि. अकोला येथील सन 2022-23 चे शासनाचे आधारभुत किंमत योजने अंतर्गत नाफेड खरीप व रब्बी हंगाम हरभरा खरेदी करण्यासाठी हमाल पुरवठा केला होता व तसा करार कृषी उत्पन्न बाजार समिती तेल्हारा सोबत केला होता. त्याचे शासनाचे दरानुसार प्रति. क्विंटल 44 रूपये याप्रमाणे एकुण 14,39,592/- (चैदा लाख एकोणचाळीस पाचशे ब्यानौव) रूपये मिळणे करीता सचिव सुरेश सोनोने कृषी उत्पन्न बाजार समिती तेल्हारा यांचे कडे जुन-2023 मध्ये बिल सादर केले होते. सदर बिल मंजुर होवुन आजपावेतो मला 4,93,000/- (चार लाख त्रानौव हजार) रूपये चेक व रोख स्वरूपात मिळाले असुन उर्वरीत 9,46,592/-(नऊ लाख शेचाळीस हजार पाचशे ब्यानौव) रूपये कृषी उत्पन्न बाजार समिती तेल्हारा यांचे कडुन घेणे बाकी असल्याने नमुद रक्कम मिळणेबाबत मी लेखी अर्ज सभापती व सचिव कृषी उत्पन्न बाजार समिती तेल्हारा यांना दिले असता दिनांक 18/09/2023 रोजी उपसभापती कृषी उत्पन्न बाजार समिती तेल्हारा श्री.प्रदीप ढोले यांनी फोनद्वारे कळविले की,''तुम्ही लगेच माझ्या घरी या'' त्यानुसार मी उपसभापती श्री. प्रदिप ढोले यांच्या घरी जावुन त्यांना माझे बिल मिळणेबाबत विनंती केली असता, त्यांनी मला सांगीतले की,''आमचा निवडणुकीला खुप खर्च झाला असुन तुझे बिल काढायचे असेल तर तुला सभापती सुनिल इंगळे, मला व सचिव सुरेश सोनोने अशांना मिळुन 1,00,000/- रूपये द्यावे लागतील'' असे म्हटले. त्यानंतर कृषी उत्पन्न बाजार समिती येथे जावुन सभापती श्री. सुनिल इंगळे यांना माझे बिल देण्याबाबत विनंती केली असता सभापती श्री. सुनील इंगळे यांनी सुध्दा मला 1,00,000/-रूपये लाचेची मागणी केली. तसेच सचिव श्री. सुरेश सोनोने यांनी पण मला तुझे बिल काढायचे असेल तर 1,00,000/-रूपये द्यावे लागतील असे म्हणुन पैश्याची मागणी केली. त्यावर मी त्यांना ''सदरचा पैसा हा माझा नसुन हमाली केलेल्या लोकांचा आहे. तरी तुम्ही माझे बिलाचे पैसे लवकर दिले तर बरे होईल'' असे म्हणुन विनंती केली. त्यानंतर सभापती श्री. सुनिल इंगळे यांनी मला म्हटले की,''आम्ही तुला एक एक लाखाचे दोन चेक देतो, त्यापैकी तु 1,00,000/- रूपयेचा चेक घेवुन जा व आम्हाला पैसे आणुन दे व त्यानंतर दुसरा चेक घेवुन जा, ते चेक मी सद्या उपसभापती श्री. ढोले सर यांचेकडे ठेवले आहेत.'' त्यावर मी त्यांना नाईलास्तव ''हो'' म्हणुन तेथुन निघुन आलो. तरी सभापती श्री. सुनिल इंगळे आणि उपसभापती श्री. प्रदिप ढोले व सचिव सुरेश सोनोने कृषी उत्पन्न बाजार समिती तेल्हारा जि. अकोला हे मला मागणी करीत असलेले एक लाख रूपये कोणतीही शासकीय फि किंवा भरणा नसुन सदर रक्कम ही लाच रक्कम असल्याने व सदर रक्कम मला नमुद लोकांना द्यायची इच्छा नसल्याने मी दिनांक 20/09/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, अकोला येथे गैरअर्जदार सभापती श्री. सुनिल इंगळे व उपसभापती श्री. प्रदिप ढोले व सचिव श्री. सुरेष सोनोने कृषी उत्पन्न बाजार समिती तेल्हारा जि. अकोला यांच्या विरूध्द तक्रार दिली होती. मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने श्री. नरेंद्र खैरनार, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंध विभाग, अकोला यांनी दोन शासकिय पंचासमक्ष दिनाक 21/09/2023 रोजी 14.30 ते 17.50 वाजेच्या दरम्यान लाच पडताळणी कार्यवाही केली असता, गैरअर्जदार उपसभापती श्री. प्रदिप ढोले यांनी फोनवरून 1,00,000/- (एक लाख रूपये) लाचेची मागणी करून ती लाच रक्कम सोमवारी घेवुन येण्यास सांगुन लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले व गैरअर्जदार सभापती श्री. सुनिल इंगळे यांनी तक्रारदार यांच्या

प्रत्यक्ष भेटी दरम्यान "उपसभापती ढोले सर जे म्हणतील ते... तुम्ही त्यांच्याशी बोला" असे म्हणुन लाच मागणीस प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यानंतर आज दिनांक 25/09/2023 रोजी सकाळी 11.45 वाजेपासुन 16.30 वाजेपावेतो शासकिय पंचासमक्ष कृषी उत्पन्न बाजार समिती, तेल्हारा, जि. अकोला येथे सापळा कारवाई आजमाविण्यात करण्यात आली असता. सदर सापळा कारवाई दरम्यान गैरअर्जदार उपसभापती श्री.प्रदिप ढोले यांना भेटलो तेव्हा मी माझे नेसत्या जिन्सपॅन्टच्या उजव्या मांडीवरील खिशातुन लाचेची 1,00,000/- रूपये काढुन समोर धरली असता त्यांनी उजव्या हाताने लाच रक्कम स्विकारून आपल्या पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवली. त्यानंतर मी सापळा पथकास लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजीत ईशारा करताच अॅन्टी करप्शन ब्युरोचे अधिकारी व अंमलदार यांनी लाचेच्या 1,00,000/- रक्कमेसह रंगेहाथ त्यांना ताब्यात घेतले व सभापती श्री. सुनिल इंगळे यांना सुध्दा ताब्यात घेतले. तरी दिनांक 21/09/2023 रोजी 14.30 ते 17.50 वाजेच्या दरम्यान गैरअर्जदार क्रमांक 1) श्री. प्रदिप मधुकरराव ढोले, वय-62 वर्ष, उपसभापती कृषी उत्पन्न बाजार समिती, तेल्हारा जि. अकोला यांनी सन 2022-23 चे शासनाचे आधारभुत किंमत योजने अंतर्गत नाफेड खरीप व रब्बी हंगाम . हरभरा खरेदी करण्यासाठी तक्रारदार यांनी पुरवीलेल्या हमाल बिलाचे उर्वरीत 9,46,592/-(नऊ लाख शेचाळीस हजार पाचशे ब्यानौव) रूपये देण्याच्या मोबदला म्हणुन 1,00,000/- रूपये लाचेची मागणी करून गैरअर्जदार क्रमांक 2) श्री. सुनिल मोतीराम इंगळे, वय-49वर्ष, सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, तेल्हारा जि. अकोला यांनी लाच रक्कम देण्यास प्रोत्साहन दिले असुन दिनांक 25/09/2023 रोजी 12.30 वाजेच्या सुमारास कृषी उत्पन्न बाजार समिती तेल्हारा येथे अॅन्टी करप्शन ब्युरो अकोला येथील अधिकारी व अंमलदार यांनी केलेल्या कार्यवाही मध्ये गैरअर्जदार उपसभापती श्री. प्रदिप ढोले हे प्रत्यक्ष 1,00,000/- रूपये लाच स्विकारतांना मिळुन आले आहेत. तरी नमुद दोन्ही गैरअर्जदार प्रदिप ढोले आणि सुनिल इंगळे यांचेविरूध्द माझी कायदेशिर फिर्याद आहे. माझी फिर्याद मी सांगीतल्या प्रमाणे लॅपटापवर टंकलिखीत करण्यात आली मी वाचुन पाहीली माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

SACHIN CHANDRAKANT YADAV(I (Inspector)) / DGPSCYM7801

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **or (किंवा)**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SACHIN CHANDRAK
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DGPSCYM7801